# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

(गृह शाखा)

दुरध्वनी क्रमांक - 0217-2731020 ई मेल - dcbsolapur@gmail.com

वाचा
१. भारतीय साथरोग प्रतिबंध कायदा १८९७
२. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५ दि. १४ मार्च, २०२०.
४. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील क्रं.कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५ दि.११.८.२०२१, दि. १६.८.२०२१, दि.२४.०९.२०२१ रोजीचे अधिसूचना
५. या कार्यालयाचे आदेश क्र.२०२१/डीसीबी/२/आरआर/३६८४ दि.०४/०८/२०२१

जा.क्र. २०२१/डिसीबी/०२/आरआर/ 5770 दिनांक :- २८/१०/२०२१

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

**विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रार्दुभाव रोखणेसाठी आठवडी बाजार चालू करणेबावत.**

**आदेश :-**

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि. १४ मार्च, २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिद्ध केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. DMU/२०२०/CR-९२/DisM-१ दि. २९.६.२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, शासनाकडील वाचा क्र. ४ मधील आदेशान्वये राज्यात कोव्हीड-१९ संसर्गाच्या अनुषंगाने ब्रेक दि चेन अंतर्गत शासनाने सुधारित आदेश पारित केलेले आहेत. यामध्ये कोव्हिड-१९ संसर्गाच्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या निर्बंधामध्ये शिथिलता देण्यात आलेली आहे. याअनुषंगाने या कार्यालयाकडील वाचा क्र.५ चे आदेशान्वये सर्व प्रकारचे आठवडे बाजार,जनावरांचा बाजार भरण्यास लागू केलेले निर्बंध शिथील करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर, जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सोलापूर जिल्हयातील (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) दि. २८.१०.२०२१ पासून सर्व प्रकारचे आठवडा बाजार,जनावरांचा बाजार भरण्यास परवानगी देत आहे.

सदर आठवडा बाजार मध्ये कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने राज्य शासनाने तसेच जिल्हा प्रशासनाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन होते अगर कसे याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासन यांनी नियंत्रण

ठेवावे. तसेच सदर आठवडा बाजार यांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासन यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील. सुरू करणेत येणा-या आठवडे बाजाराशी संबंधित असणा-या आस्थापनांनी आठवडे बाजार भरणा-या ठिकाणी मास्कचा वापर, सोशल डिस्टसिंग, सॅनिटायझेशन याबाबतच्या नियमांचे (Covid Appropriate Behaviour) तसेच शासनाने व या कार्यालयाने कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होते आहे अगर कसे याबाबत नियंत्रण स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस प्रशासन यांनी ठेवावे. त्यानुसार सदरचे आठवडा बाजार स्थानिक स्वराज्य संस्था यांनी ठरवून दिलेल्या नियमानुसार सुरु राहणेस परवानगी असेल.

सदरचा आदेश दि. २८.१०.२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

DISTRICT MAGISTRATE
जिल्हा दंडाधिकारी
सोलापूर
SOLAPUR

(मिलिंद शंभरकर,भा.प्र.से.)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

**प्रत- माहितीस्तव सादर :-**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत - आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. अधिष्टाता, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
६. जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर
७. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, ------------------------------------
८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी --------------------------------
९. सहायक कामगार आयुक्त, सोलापूर
१०. जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर
११. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिद्धीस्तव.
१२. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

E:\E DRIVE\DCB-२\२०१९-२०२०\Corona\Solapur Corona Letters-१.doc